**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य,**

**मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१.**

# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२६-२७

## जाहीर प्रकटन

शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील इयत्ता ११ वी केंद्रिय ऑनलाईन प्रवेश सुरु करण्यात आली आहे. राज्यातील एकूण ९५९४ कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. आत्तापर्यंत एकूण १२,५१,२५९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

पहिल्या फेरीमध्ये प्रवेश निश्चित करण्याचा अंतिम दिनांक ०३/०६/२०२६ रोजी पर्यंत ४,५१,०५२ विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेश कनिष्ठ महाविद्यालयात निश्चित केले आहेत.

दिनांक ०६/०६/२०२६ नियमित दुस-या फेरीतील प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे. सदर दुस-या नियमित फेरीचे वेळापत्रक सोबत जोडून देण्यात येत आहे.

विद्यार्थी / पालक तसेच कनिष्ठ महाविद्यलयातील प्राचार्य यांनी याची नोंद घ्यावी. या बाबीची व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी. ही विनंती.

**अधिकृत पोर्टल-**https://mahafyjcadmissions.in
**ई-मेल आयडी** – support@mahafyjcadmissions.in
**हेल्पलाईन नंबर - ८५३०९५५५६४.**

**(डॉ. महेश पालकर)**
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे

**स्थळ:** पुणे
**दिनांक:** ०४ जून, २०२६

**शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे**
**इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रकिया सन २०२६-२७**
**नियमित फेरी २ वेळापत्रक**

| अ.क्र. | CAP प्रवेश कार्यवाही व सर्वसाधारण बाबी | कालावधी | Quota प्रवेश कार्यवाही व सर्वसाधारण बाबी | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १. | • नविन विद्यार्थ्यांची नोंदणी आणि भाग-१ मधील दुरुस्ती करणे.<br>• विद्यार्थी पसंतीक्रम अर्ज भाग-२ भरणे.<br>• विद्यार्थी किमान १ आणि जास्तीत जास्त १० कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरणे.<br>• विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीक्रम, गुण आणि अर्जामध्ये दिलेल्या लागू आरक्षणानुसार (असल्यास) कनिष्ठ महाविद्यालय दिले जातील.<br>• प्रवेश अर्ज लॉक करणे आवश्यक आहे. | ०६ जून २०२६ सकाळी ०८.००<br>ते<br>०९ जून२०२६ सायंकाळी ०६.०० वा. पर्यंत | • नविन विद्यार्थ्यांची नोंदणी आणि भाग-१ मधील दुरुस्ती करणे.<br>• विद्यार्थ्यांनी कोटा प्रवेशासाठी (व्यवस्थापन कोटा, संस्था अंतर्गत प्रवेश कोटा व अल्पसंख्याक कोटा) पंसतीक्रम ऑनलाईन नोंदविणे व लॉक करणे.<br>• (नियमित फेरी-२ मध्ये कोट्यांतर्गत प्रवेशासाठी कोटा पसंती अर्ज पुन्हा लॉक करणे आवश्यक आहे.) | प्रवेश अर्ज |
| २. | अलॉटमेंट प्रोसेस | १० जून, २०२६ ते १२ जून २०२६ | अलॉटमेंट प्रोसस | अलॉटमेंट प्रोसेस |
| ३. | • वाटप प्रक्रिया (अलॉटमेंट प्रोसेस) (कॅप फेरी-२)<br>• पोर्टलवर फेरीसाठी कनिष्ठ महाविद्यालय वाटप यादी प्रदर्शित करणे.<br>• विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये प्रवेशासाठी वाटप केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांचा तपशिल प्रदर्शित करणे.<br>• कनिष्ठ महाविद्यालयांना वाटप केलेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रदर्शित करणे.<br>• प्रवेश फेरीसाठी कटऑफ यादी प्रदर्शित करणे. (पोर्टलवर प्रसिध्द केले जाईल.)<br>• विद्यार्थ्यांना SMS व्दारे संदेश पाठविणे. | १३ जून २०२६ रोजी सकाळी १०.०० वा. | • कोट्यांतर्गत अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यालयांच्या लॉगिन मध्ये दर्शविणे (इन-हाऊस, व्यवस्थापन, अल्पसंख्याक कोटा)<br>• विद्यालयांनी प्रवेशासाठी कोटा गुणवत्ता यादी/निवड यादी दर्शनी भागात प्रसिध्द करणे. | यादी प्रसिध्द करणे |
| ४. | • वाटप केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयास सहमत असल्यास विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी पुढे जा (proceed for admission)<br>• कागदपत्र पडताळणीसाठी वाटप केलेल्या महाविद्यालयात उपस्थित राहणे आणि विहित शुल्क भरणे इत्यादी. विद्यार्थ्यांना वाटप केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित करणे.<br>• महाविद्यालय लॉगिनवर प्रवेशाची पुष्टी, नकार आणि प्रवेश रद्द करणे. | १३ जून, २०२६ दुपारी १२.००<br>ते<br>१६ जून २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वा. पर्यंत | • विद्यालयांनी प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांना संपर्क करणे (विद्यालयांनी कोट्यांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना त्यांची निवड झाल्याबाबत व या कालावधीत प्रवेश घेण्यासाठी येण्याबाबत कळविण्यात यावे.)<br>• विद्यार्थ्यांनी कोट्यांतर्गत प्रवेश निश्चित करणे (संबंधित कोट्यांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करणे.)<br>• विद्यालयांनी पात्र विद्यार्थ्यांचे कोट्यांतर्गत प्रवेश निश्चित करणे (विद्यालयांनी आपल्या विद्यालयात कोट्यांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना आवश्यक संपूर्ण पडताळणी व कागदपत्रांची पडताळणी करुन विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करावे.) | प्रवेश |
| ५. | कनिष्ठ महाविद्यालय संबंधित कामकाज | १७ जून २०२६ | कनिष्ठ महाविद्यालय संबंधित कामकाज | - |
| ६. | • डेटा प्रोसेस<br>• तिसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करणे | १८ जून २०२६<br>१८ जून २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वा. | • डेटा प्रोसेस<br>• तिसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करणे | डेटा प्रोसेस |
| ७. | • रिक्त जागा प्रदर्शित करणे | १९ जून २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. | • रिक्त जागा प्रदर्शित करणे | रिक्त जागा प्रदर्शित करणे |

**टीप- या फेरीमध्ये सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज अनलॉक करण्यात येणार असल्याने सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेश अर्ज (भाग-१ व २) लॉक करणे अनिवार्य आहे. वरील वेळापत्रकानुसार प्रत्येक कार्यवाही उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये व विद्यार्थी आणि पालक यांनी वेळेत पूर्ण करावी.**

Digitally signed by
PALKAR MAHESH MADHUKAR
Date: 04-06-2026 15:53:36

(डॉ. महेश पालकर)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे

**स्थळ:** पुणे
**दिनांक:** ०४ जून, २०२६